दूरध्वनी क्रमांक :
०२०-२५६०१२१८
०२०-२५६०१२०६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

परीक्षा समन्वय विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७
Website : www.unipune.ac.in
e-mail : coe@unipune.ac.in

## सुधारित परिपत्रक क्रमांक :२५७

**विषय : परीक्षा सुरु होण्यापूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षार्थींनी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे व परीक्षा हॉलमध्ये कोणतेही इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट घेऊन जाण्यास बंदीबाबत.**

या परिपत्रकाव्दारे सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/विद्यापीठातील शैक्षणिक विभागांचे विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेच्या धर्तीवर (NEET) विद्यापीठ परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सन २०१७ च्या व्दितीयार्धातील परीक्षांपासून खालील उपाययोजना अंमलात येतील.

**१. परीक्षार्थींनी परीक्षा सुरु होण्याच्या नियोजित वेळेपूर्वी अर्धा तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.**

**२. परीक्षेसाठी विद्यार्थी वर नमूद केल्या कालावधी नंतर आल्यास त्याची पुरेशी तपासणी करुन प्रचलित नियमाप्रमाणे परीक्षा सुरु झाल्यानंतर जास्तीत जास्त ३० मिनीटे कालावधी पर्यंत उशीरा आल्यास परीक्षेस बसण्यास परवानगी द्यावी.**

**३. परीक्षार्थींना भ्रमणध्वनी (Mobile Phone) किंवा कोणतेही इलेक्ट्रॉनिक्स गॅझेट/आधुनिक संदेशवहन उपकरणे घेऊन परीक्षा हॉलमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. परीक्षा हॉलमध्ये परीक्षार्थींकडे सदर उपकरणे आढळून आल्यास ती कायमची जप्त करण्यात येतील व कुठल्याही सबबीवर परत मिळणार नाहीत.**

विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य/मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक व विद्यापीठातील शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख यांनी वरील सूचना संबंधित विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या निर्देशनास आणून द्याव्यात व त्यांचे काटेकोरपणे पालन होईल याची योग्य खबरदारी घ्यावी.

( डॉ. अशोक चव्हाण ) 5.X.17
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

गणेशखिंड, पुणे- ४११००७.
जा. क्र. परीक्षा/ समन्वय/9299
दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०१७

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तवः

प्रति,

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये
२. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त संस्था
३. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग
४. परीक्षा विभागातील सर्व उपकुलसचिव/सहायक कुलसचिव